## 'विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व निवड' दोन दिवशीय समुपदेशन व व्यक्तिमत्व शिबीर

**दि.०८ व ०९ जानेवरी २०१८ रोजी** आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व विस्तार केंद्र आणि मिलिंद विज्ञान महाविद्यालय अतंर्गत दोन दिवसीय **'विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व निवड'** आयोजन करण्यात आले.

### दि.०८ जानेवारी २०१८

**सत्र पहीले –**

या कार्यक्रमाचे **उद्घाटन प्रा.डॉ.संजय मुन,** विभाग प्रमुख, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या बीज भाषणात सांगतांना विद्यार्थ्यांना आजीवन शिक्षण विस्तार सेवा योजनेचे महत्व समजावून सांगीतले. तसेच भारतीय शिक्षण पध्दती व पाश्चात्य शिक्षण पध्दती याच्यातील फरक सांगीतला. तसेच डॉ.अब्दूल कलाम यांच्या व्हिजन २०२० वर प्रकाश टाकला. तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ध्येय निश्चिती व ध्येय प्राप्ती कशा प्रकारे साधता येईल या विषयावर विषयावर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे -**

**श्री.महेश अष्ठपुत्रे, उद्योजक – सौर उर्जेतून स्वयं रोजगाराची निर्मिती -**

यांनी सौरउर्जा या क्षेत्रामधील रोजगाराची संधी यावर दृकश्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे –**

**डॉ.सुरेखा जाधव, प्राचार्या,** महिला कला महाविद्यालय,हर्सुल, औरंगाबाद - **समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या प्रगतीसाठी स्वतःमधील नकारात्म गुण कमी करुन स्वतःचा विकास करावा.

**दिनांक ०९ जानेवारी २०१८**

**प्रथम सत्र -**

**डॉ.पुरुषोत्तम देशमुख, अर्थशास्त्र विभाग,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी स्वतःमध्ये आत्मविश्वास तसेच व्यक्तिक देह बोली योग्य असावी असे सांगीतले.

**डॉ.सादीक बागवान, समाजशास्त्र विभाग,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी स्पर्धा परिक्षेची तयारी करत आसतांना वेळेचे नियोजन योग्य प्रकारे करावे व त्या सबंधी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

**सत्र तिसरे -**

**मा.डॉ.कृष्णा भोगे, भोगे** - करिअर डेव्हलफमेंट ॲकॅडमी, औरंगाबाद सरांनी विद्यार्थ्यांना **'स्पर्धा परिक्षा एक चिंतन'** या विषयावर मार्गदर्शन केले. सरांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा म्हणजे काय... याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कुठल्याही परिक्षेची तयारी करतांना आगोदर ध्येय निश्चीत करावे व त्या दृष्टीने वाटचाल करावी म्हणजे यश लवकरात लवकर मिळेल. पदवी शिक्षणा दरम्यान स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी वेळेचे व्यवस्थापन कसे ठरवावे.. स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना अभ्यासामध्ये नेहमी सातत्य असावे, एखादया वेळेस अपयश आले तर खचून न जाता प्रयत्न चालू ठेवावे व तसेच नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. माणसाची निर्णय घेण्याची क्षमता उत्कृष्ठ असावी असे त्यांनी या वेळेस सांगितले

**समारोप समारंभ - अध्यक्ष प्र.प्राचार्य महमंद शफीक** यांनी या प्रसंगी समारोप भाषणात सांगितले की, गुणवत्तापुर्ण शिक्षण घेतांना व्यक्तिमत्व विकास साधावा. व स्वतःचे व्यक्तीमत्व चांगल्या प्रकारे घडवून देशाचा उत्तम नागरीक बनावे. शेवटी सहा विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या आवश्यकते संबंधी आपले मत व्यक्त केले.

**(डॉ.आर.एस.यन्नावार)**

कार्यक्रम अधिकारी
आजीवन व विस्तार विभाग
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

PROGRAMME OFFICER
DEPT OF LIFE-LONG LEARNING
& EXTENSION
MILIND COLLEGE OF SCIENCE
Nagasenvana, Aurangabad.

**(डॉ.एस.डी.राठोड)**

प्र.प्राचार्य
मिलिंद विज्ञान महाविद्यालय
औरंगाबाद

PRINCIPAL
MILIND COLLEGE OF SCIENCE
AURANGABAD.








MILIND COLLEGE OF SC.
LIBRARY

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

१२-८+८ = २८, किंमत: ₹ ३.५०

औरंगाबाद, सोमवार, दि. १५ डिसेंबर २०

## 'मिलिंद' मध्ये व्याख्यान

औरंगाबाद : मिलिंद विज्ञान महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागांतर्गत प्रा. नैनपालसिंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. महंमद शफिक, डॉ. राजेंद्र कनावार, प्रा. डॉ. डी. व्ही. कुरुडे, प्रा. डॉ. ए. एस. मुंडे यांची उपस्थिती होती.